## पुणे महानगरपालिका
## स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्र. १०
## सभा क्र.१२, दिनांक ११/०६/२०२४ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक तहकूब सभा (शुक्रवार, दि. ०७/०६/२०२४ रोजीची) मंगळवार, दि. ११/०६/२०२४ रोजी दुपारी ३.५५ (तीन वाजून पंचावन्न मिनिटे) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते

| | | |
|---|---|---|
| मा. डॉ राजेन्द्र ब भोसले | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा. पृथ्वीराज बी.पी. | – | अति.महापालिका आयुक्त (इ) |
| मा. सौ. योगिता भोसले-निकम | – | प्रभारी नगरसचिव |
| मा. प्रशांत वाघमारे | – | शहर अभियंता |
| मा. सौ. उल्का कळसकर | – | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| मा. श्रीनिवास बोनाला | – | मुख्य अभियंता (प्रकल्प) |
| मा. अनिरूध्द पावसकर | – | मुख्य अभियंता (पथ) |
| मा. नंदकिशोर जगताप | – | मुख्य अभियंता (पा.पु.विभाग) |
| मा. गणेश सोनुने | – | उपायुक्त, भांडार विभाग, आपत्ती व्यवस्थापन |
| मा. अशोक घोरपडे | – | मुख्य उद्यान अधिक्षक |
| मा. सौ. किशोरी शिंदे | – | उपायुक्त, परिमंडळ क्र. १ |
| मा. संजय शिंदे | – | उपायुक्त, परिमंडळ क्र. ३ |

### कार्यपत्रिकेवरील विषय

<u>घनकचरा व्यवस्थापन आढावा</u>

**विषय क्र.७२**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी १५ क्षेत्रीय कार्यालयाकडील दि.०१/०५/२०२४ ते दि.३१/०५/२०२४ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणे बाबत मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घकव्यका/११०७, दि.०५/०६/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

<u>**माहितीसाठी आलेले विषय**</u>

**विषय क्र.७३**

दिनांक २०/०५/२०२४ ते २६/०५/२०२४ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ३४ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/७२, दि.०३/०६/२०२४ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.७४**

दिनांक १३/०५/२०२४ ते १९/०५/२०२४ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण २६ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/७३, दि.०३/०६/२०२४ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.७५ त्वर्य**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.५, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०४/२०२४ ते दि.१५/०४/२०२४ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार वहतल तद्‌नुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/[illegible] क्र. [illegible], दि.०५/०६/२०२४ चे प.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.७६ त्वर्य**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.५, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०५/२०२४ ते दि.३१/०५/२०२४ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व इतर तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/७९, दि.०५/०६/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.७७ त्वर्य**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.५, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०५/२०२४ ते दि.१५/०५/२०२४ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व इतर तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/८०, दि.०५/०६/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.७८ त्वर्य**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.५, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०४/२०२४ ते दि.३०/०४/२०२४ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व इतर तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/८१, दि.०५/०६/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.७९ त्वर्य**

टेंडर क्र.PMC/SWM/2023-24/63 Setting up a 75 MTPD Material Recovery Facility along with its operation and maintenance for a period of 10+5 years at Handewadi, Pune या कामी(बी-२ पद्धत) निविदा मागविली असता आलेल्या ४ निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे. आदर्श भारत एनवायरो प्रा. लि., पुणे यांचेकडूनअ) स्थापत्य कामाचा खर्च र.रु. २,९८,४५,०००/- (जीएसटी सह) ब) यांत्रिकी खर्च र.रु. ६,४६,५०,०००/- (जीएसटी सह) क) १०+५ वर्ष करिता देखभाल दुरुस्ती खर्च र. रु. ४८,१४,४८,५०५/- (जीएसटी विरहित) (तडजोडीने) असे एकूण रक्कम रु ५७,५९,४३,५०५/-पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस व खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/८३, दि.०६/०६/२०२४ चे पत्र.

१) टेंडर क्र.PMC/SWM/2023-24/63 Setting up a 75 MTPD Material Recovery Facility along with its operation and maintenance for a period of 10+5 years at Handewadi, Pune या कामाचे कमी दर देणारे ठेकेदार मे. आदर्श भारत एनवायरो प्रा. लि., पुणे यांचेकडून अ) स्थापत्य कामाचा खर्च र.रु. २,९८,४५,०००/- (जीएसटी सह) ब) यांत्रिकी खर्च र. रु. ६,४६,५०,०००/- (जीएसटी सह) क) १०+५ वर्ष करिता देखभाल दुरुस्ती खर्च र. रु. ४८,१४,४८,५०५/- (जीएसटी विरहित) (तडजोडीने) असेएकूण रक्कम रु.५७,५९,४३,५०५/- पर्यंत काम करून घेणेस.

२) सदर कामी होणारा खर्च घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील खालील अर्थशीर्षकावरून करणेस सन २०२४-२५ (CE19A123) ताब्यात येणाऱ्या जागांवर प्रक्रिया प्रकल्प उभारणे, प्रकल्पांसाठी आवश्यक सुविधा विषयक कामे करणे इ. सन २०२४-२५ (RE19A148) घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उभारलेल्या प्रकल्पांची देखभाल दुरुस्ती व तदनुषंगीक कामे करणेस.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.८० त्वर्य**

टेंडर क्र. PMC/SWM/2023-24/66 Setting up a 75 MTPD Material Recovery Facility along with its operation and maintenance for a period of 10 years at Survey No. 110, Ramtekdi Industrial Estate, Pune या कामी (बी-२ पद्धत) निविदा मागविली असता आलेल्या ४ निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे. आदर्श भारत एनवायरो प्रा. लि., पुणे यांचेकडूनअ)यांत्रिकी खर्च र. रु. ४,५५,००,०००/- (जीएसटी सह) अधिक ब) दहा वर्ष करिता देखभाल दुरुस्ती खर्च र.रु.२४,९१,२७,२८२=५० (जीएसटी विरहित) (तडजोडीने) असे एकूण रक्कम रु.२९,४७,२७,२८२=५० रक्कमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस व खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/८४, दि.०६/०६/२०२४ चे पत्र.

१) टेंडर क्र. PMC/SWM/2023-24/66 Setting up a 75 MTPD Material Recovery Facility along with its operation and maintenance for a period of 10 years at Survey No. 110. Ramtekdi Industrial Estate, Pune या कामाचे सर्वात कमी दराचे ठेकेदार मे. आदर्श भारत एनवायरो प्रा. लि., पुणे यांचेकडून अ) यांत्रिकी खर्च र. रु. ४,५५,००,०००/- (जीएसटी सह) ब) दहा वर्ष देखभाल दुरुस्ती खर्च र. रु. २४,९१,२७,२८२=५० (जीएसटी विरहित) (तडजोडीने) असे एकूण रक्कम रु.२९,४७,२७,२८२=५० पर्यंत काम करूनघेणेस.

२) सदर कामी होणारा खर्च घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील खालील अर्थशीर्षकावरून करणेस सन २०२४-२५ (CE19A123) आल्यात येणाऱ्या जागांवर प्रक्रिया प्रकल्प उभारणे, प्रकल्पांसाठी आवश्यक सुविधा विषयक कामे करणे इ. सन २०२४-२५ (RE19A148) घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उभारलेल्या प्रकल्पांची देखभाल दुरुस्ती व तदनुषंगीक कामे करणेस.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.८१ त्वर्य**

पुणे महानगरपालिका आरोग्य कार्यालयाकडील कार्यरत असलेले सेवकश्री.प्रवीण दत्तात्रय पासलकर, हुद्दा- बिगारी(वर्ग-४) यांच्या निलंबन कालावधीस दि.०१/०१/२०२४ रोजी पहिली सहामाही पूर्ण झालेली असून सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र.५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/साप्र/८५, दि.०७/०६/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.८२ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.३५०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.३५०.०० कोटी७०% प्रमाणेमे महाराष्ट्र शासन, शासननिर्णयक्र.संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४,दि.१४/०२/२०२४नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६,००० कोटी पेक्षाजास्त नक्त मूल्य असणाऱ्या व Reserve Bank Of India यांच्या Domestic Systemically Important Banks च्या यादीत नावे असणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/८६, दि.०७/०६/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.८३ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.१५०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.१५०.०० कोटी ३०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६,००० कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या व Reserve Bank Of India यांच्या Domestic Systemically Important Banks च्या यादीत नावे असणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/८७, दि.०७/०६/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**स्वाक्षरी/–xxx**
**(योगिता भोसले)**
**प्र.नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**स्वाक्षरी/–xxx**
**(डॉ.राजेंद्र भोसले)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**